Emp (5)

क्र राम/साप्र/माज/सांकार्य/राशि/शाशि/
मबा/साआकुक/असं/(औ)/VIP-1459/2014

राज्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

राज्यमंत्री

सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, शालेय शिक्षण, महिला व बाल विकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण व अल्पसंख्याक विकास (औकाफसह)

महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

*www.maharashtra.gov.in*

दिनांक 21 AUG 2014

श्री.शेख मुबीन रा.सोलापूर यांचे दिनांक १२/८/२०१४ रोजीचे निवेदन सोबत जोडत आहे.

श्री.शेख मुबीन यांचा भाऊ श्री.मोहसीन शेख यांची दिनांक २/६/२०१४ रोजी पुणे येथे निघृण हत्या करण्यात आली. श्री.मोहसीन हा कुटुंबातील एकमेव कमवता मुलगा असल्यामुळे त्यांच्या दुर्दैवी हत्येनंतर श्री.मुबीन यांस शासकीय नोकरी देणेबाबत शासनस्तरावर विचार करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे याबाबतचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागात प्रलंबित असल्याचे समजते.

श्री.मुबीन यांना नोकरीची नितांत गरज असून त्यांच्या कुटुंबियांना आधार देण्याच्या अनुषंगाने त्यास सत्वर शासकीय नोकरी देणेबाबत कार्यवाहीचे आदेश संबधितांना द्यावेत, ही विनंती.

(फौजिया खान)

**प्रति,**
**मा.ना.श्री.पृथ्वीराज चव्हाण**
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय,मुंबई-३२.

परि. ६

**महाराष्ट्र शासन**

फोन नं.- ०२२-२२७९३४२०
ई-मेल: gad8.mantralaya@gmail.com

क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.८९/६२२/का.८,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
दिनांक : ०६/०९/२०१४

**प्रति,**

श्री. मुबीन सादीक शेख,
पोस्टल कॉलनी, बी. नं. बी/२५/२,
सिव्हील लाईन्स, होटगी रोड,
सोलापूर.

**विषय :** अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्याबाबत.
**संदर्भ :**आपले मा. मुख्यमंत्री महोदयांना लिहलेले दिनांक निरंक चे पत्र.

**महोदय,**

आपल्या उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार केवळ शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबियांपैकी एका व्यक्तीला शासन सेवेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय आहे. आपले भाऊ श्री. मोहसीन सादीक शेख हे शासकीय कर्मचारी नव्हते. त्यामुळे आपणास राज्य शासन सेवेत नियुक्ती देता येऊ शकत नाही. याबद्दल मी दिलगीरी व्यक्त करते.

**आपली,**

(स्वाक्षरी)

**(शारदा पाटील)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

Eo-lP (7)

From:- **Shaikh Mubeen Mohammad Sadiq.**
Postal Colony, B-No- B-2/2,
Civil Lines Hotgi Road Solapur.
MAHARASHTRA INDIA.
**Home-0217-2602550.**
**Mobile- 9764411085 / 9637564448.**

16/09/2014

To

**Mrs Sharda Patil**
Desk Office,
Govt of Maharashtra Mantralaya,
Mumbai-410032.

**Sub: <u>Government Job on Humanity Grounds.</u>**

*Ref: Your Letter Dated No Anukampa-1014/PR.Kramank. 89/622/KA.8. Smanaya Prashasan Vibhag. Mantralaya Mumbai.*

Respected Madam,

With ref to the above mentioned subject i regret to know that my application for Govt Employment has been rejected. Please be informed that the undersign is expecting Govt employment on HUMANNITY Grounds as Late (Shaheed) Mohsin Shaikh was the only source of income of my family.

Attached please find herewith a letter issued by Hon'ble Sushil Kumar Shinde Former Home Minister Govt of India Dt:- 10/09/2014 & received by your officer under Inward No-691072 dt: 11-09-14 which is self explanatory.

Copy of letter issued by Hon'ble Fauziya Khan is also attached for your ready reference.

In view of above you are requested to re open my file on Humanity grounds for further processing & appropriate action.

I am eagerly waiting for my appointment order.

**Thanking you,**

**Yours Faithfully.**
Mubeen
**Mubeen Shaikh**
**9637564448.**
**C.C to:-**

- **Hon'ble Sushil Kumar Shinde Saheb (Former Home Minister Govt of Maharashtra.**
- **Hon'ble Fauziya Khan (Mantralaya Mumbai)**
- **Respectable Prinit Shinde (M.L.A)**

O9P (8)

From:- **Shaikh Mubeen Mohammad Sadiq.**
Postal Colony, B-No- B-2/2,
Civil Lines Hotgi Road Solapur.
MAHARASHTRA INDIA.
**Home- 0217-2602550.**
**Mobile- 9764411085 / ~~9637564448~~.**
9096303139

March, 2015
Dt:- [redacted]

To,

**Hon'ble Commissioner,**
**Solapur Mahanagarpalika,**

Solapur,

**Sub: <u>Application for Employment on Humanity Grounds.</u>**

Respected Sir,

My Elder brother Late Mohsin Mohammad Sadiq Shaikh was murdered at Pune on 03rd June 2014 by HRS.

He was the only source of income to my family you are requested to consider my application for Suitable post., clear vacancy P13. with full scale.

My Bio Date & necessary documents are attached.

Please do the needful,

**Thanking you,**

**Yours Faithfully.**

Mubeen

**Mubeen M Sadiq Shaikh**
**9637564448.**

२।१७

Tipani from 02.03.2015

# सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-४/३९२
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर. दि.१० /०३/२०१५.

प्रति,
श्री.शेख मुबीन मोहमद सादीक,
रा.पोस्टल कॉलनी, बी-२/२, सिव्हील लाईन्स,
होटगी रोड, सोलापूर.

विषय :- सोलापूर महानगरपालिकेमध्ये नोकरी मिळणेबाबत...
संदर्भ :- आपला दि.०५/०३/२०१५ चा अर्ज.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रान्वये आपण सोलापूर महानगरपालिका येथे नोकरी मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. तसेच अर्जासोबत आपला परिचयपत्रही जोडलेले आहे.

तथापी आजला सोलापूर महानगरपालिकेकडे कोणतीही सेवकभरती चालू नाही अथवा कोणतेही जाहीर प्रसिध्दीकरण करणेत आलेले नाही. तरी आपण सादर केलेल्या अर्जाबाबत कोणताही विचार करता येणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

१०।३।१५

सहाय्यक आयुक्त (स)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

①

दि. 14/06/2014

**प्रति,**

**मा. श्री आर. आर. पाटील साहेब**

**गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य,**

**मुंबई.**

अर्जदार :- मो. सादीक मो. हनीफ शेख

रा. बी-2/2 सिव्हील लाईन, पोस्टल कॉलनी,

सोलापूर.

विषय :- Victim Relief Fund मधून मदत मिळणेबाबत.

महोदय,

मी विनंती करतो की, माझा मुलगा मोहसीन मो. सादीक शेख याचा खून पूणे येथे हिंदू राष्ट्र सेनाच्या लोकांनी निर्धनपणे मारहाण करून दि. 02/06/2014 रोजी रात्रो केला आहे.

माझे उदर निर्वाह माझे मयत मुलगा मोहसीन शेख याच्यावर अवलंबून होते. त्याच्या निर्घूणपणे खून झाल्याने माझे उदर निर्वाहाची भवितव्य धोक्यात आले आले. तरी मला आपणांकडून Victim Relief Fund मधून मदत मिळावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

[signature]

**मो. सादीक मो. हनीफ शेख**

022/22025274

(2)

ATTEN. P.A. TO
Govindraj Saheb/
Jagtap Saheb.

गृहशाखा
विधान भवन आवार पुणे-१

फोन नं. ०२०-२६१३००९७ फॅक्स नं. ०२०-२६१३००९७
rdcpune@gmai.com

क्र. पत्र/कावि/९२२/२०१५
दिनांक १०/०४/२०१५

प्रति,
मा. अवर सचिव
मदत व पुनर्वसन विभाग,
नविन प्रशासकीय इमारत
१४ वा मजला, मुबई

2201 2138

विषय : दिनांक ३१/०५/२०१४ रोजी फेसबुकवरुन छत्रपती महाराज संभाजी महाराज व बाळासाहेब ठाकरे यांचे संदर्भात आक्षेपार्ह मजकूर व चित्र प्रसिध्द केल्यामूळे उमटलेल्या हिसक प्रतिक्रियेमध्ये शेख मोहसीन महंमद सादीक शेख या युवकाचा मृत्यु झालेने त्यांचे वारसाना केंद्र शासनाची मदत मिळणेबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत दिनांक ३१/०५/२०१४ रोजी पुणे पोलीस आयक्तालाय हद्दीमध्ये फेसबूक वरुन छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज व बाळासाहेब ठाकरे यांचे संदर्भाने आक्षेपार्ह मजकूर व चित्र प्रसिध्द केल्यामूळे उमटलेल्या हिसंक प्रक्रियदरम्यान दिनांक ०२/०६/२०१४ रोजी रात्री २१.१५ वा.चे. सुमारास पोलीस स्टेशन हडपसर अंतर्गत सातव प्लॉट येथील किराणा दुकानासमोर उन्नतीनगर हडपसर पुणे येथे हिंदु आरोपींनी केलेल्या मारहाणी मध्ये शेख मोहसीन महंमद सादीक या युवकाचा मृत्यु झालेला आहे.

दहशतवाद अथवा जातीय दंगलीतील बाधितांसाठी केंद्रीय सहाय्यक योजनेतर्गत मदत अदा करणेकामी गठीत जिल्हास्तरीय समितीची दिनांक ०५/०९/२०१४ रोजी बैठक घेणेत आली असून सदर बैठकीत मयत श्री. मोहसीन मोहम्मद सादीक यांना केंद्र शासनाची मदत देणेकामी पात्र ठरविणेत आले आहे.

श्री. शेख मोहसीन याचा Annexure –A मधील प्रस्ताव यासोबत जोडून सादर करणेत आले आहे. तरी श्री. शेख मोहसीन यांना शासन स्तरावरुन र.रु.३,००,०००/- इतके अनुदान मंजूर होणेस विनंती आहे.

सस्नेह।

आपला विश्वासू,
sd/- जिल्हाधिकारी
(जिल्हाधिकारी पुणे)

Note: No further reply from Mantralya/dc off-pune or Cent. Govt. (New Delhi) regarding financial Asst. against victim relief fund to the tune of Rs. Three lakhs. Plz. do the needful. Thanks.

Mob. 9764411085
Tel: 0217/2602550
DATE. 21/09/2015
PLACE. SOLAPUR

(SADIQ SHAIKH)
F/O Lt. Mohsin Shaikh
Solapur
POSTAL COLONY, B-2/7
CIVIL LINES, HOTGI RD.
SOLAPUR - 413003.

21/9/15 5.15 pm — No.
Asked to contact d-3
022/22837259 (no reply)

1/10/15 — called on 022/22026138
Jtr. Jagtap office,
Mantralaya Mumbai,
- matter is forward for financial approval.
- Asked to call after 8 to 15 days.
- It may take one or more than half month for final payment.

17/11/15 12.00 to 12.20 pm — called on 022/22026138 several times.
022/22837259
NO REPLY.

17/11/15 12.15 pm — called Pune dc Dr. Bapat madam 9422759568.
She said she forwarded to Mantralaya.
No idea about status.
Not known the no. of Mantralaya Mumbai.

17/11/15 12.22 pm — PA to Jagtap saheb (lady) responded the phone. She says saheb is not yet back from leave. She don't know when he is coming.

③

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पुणे


गृहशाखा

विधान भवन आवार, पुणे-१

फोन नं. ०२०-२२६१३००९७ फॅक्स नं.०२०-२२६१३००९७

rdcpune@gmail.com


क्र. पगम/कावि/२६७७/२०१५.
दिनांक :- १७/११/२०१५

प्रति,
श्री. सादिक शेख,
पोस्टल कॉलनी, बी-२/२,
होटगी रोड, सोलापूर-४१३ ००३

**विषय :-** दिनांक ३१/०५/२०१४ रोजी फेसबुकवरुन छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज व बाळासाहेब ठाकरे यांचे संदर्भाने आक्षेपार्ह मजकूर व चित्र प्रसिध्द केल्यामुळे उमटलेल्या हिंसक प्रतिक्रियेमध्ये शेख मोहसिन महंमद सादीक शेख या युवकाचा मृत्यु झालेने त्यांचे वारसांना केंद्र शासनाची मदत मिळणेबाबत

**संदर्भ :-** आपला दि. १७/११/२०१५ रोजीचा ई-मेल संदेश

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सादर करणेत येते की, आपला दि. १७/११/२०१५ रोजीचा ई-मेल संदेश या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रकरणी मयत मोहसिन महंमद सादीक शेख यांचे वारसांना केंद्र शासनाची मदत मिळणेचा जिल्हादंडाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव इकडील दि. १०/४/२०१५ चे पत्रान्वये मा. अवर सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांना सादर करणेत आलेला होता. परंतु सदर प्रस्तावात त्रुटी असलेने शासनाकडील दि. १० जुलै २०१५ चे पत्रासोबत मुळ प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला होता.

सदर प्रस्तावातील त्रुटी पुर्ण करुन परिपुर्ण प्रस्ताव पाठविणेकामी जिल्हादंडाधिकारी सोलापूर यांना दि. ०७/१०/२०१५ चे पत्रान्वये कळविणेत आले होते. जिल्हादंडाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झालेनंतर सदरचा प्रस्ताव मा. अवर सचिव यांचेकडे दि. ३०/१०/२०१५ चे पत्रासोबत सादर करणेत आलेला आहे.

आपली विश्वासु

(signature)

**जिल्हादंडाधिकारी पुणे करिता**

NOTE 5/6/2016

VICTIM RELIEF FUND NOT YET RECEIVED

(signature)

(M-SADIK SK)